# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार
विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर, पिन ४०१ ३०५.

जावक क्र.वविशम/आस्था/६४९ /२०१७-१८ दिनांक. २८/०९/२०१७

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सिस्टम मॅनेजर (ई-प्रशासन) हे रिक्त पद सरळसेवेने भरणेकरीता त्यासाठी दर्शविलेली अर्हता धारण करणा-या उमेदवारांकडून अर्ज www.vvcmc.in ह्या संकेतस्थळावर दिनांक १७ /१०/२०१७ पर्यंत मागविण्यांत येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नांव | पद संख्या | एकुण पद | कमाल वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १. | सिस्टम् मॅनेजर ( ई - प्रशासन ) (रु. ९३००-३४८००) ग्रेड पे ४४०० | ०१ | खुला - ०१ | खुला - ३८ वर्ष मागासवर्ग - ४३ वर्ष | मान्यता प्राप्त विद्यापिठाची संगणक अभियांत्रिकी मधिल पदवी (B.E.Computer) किंवा समकक्ष अर्हता. | डेटा सेंटर ॲडमिनीस्ट्रेशन नेटवर्किंग (लॅन व्हॅन Compount ) हार्ड वेअर मधिल ५ वर्षाचा अनुभव. |

१. वयोमर्यादा :- खुला ३८ वर्षे व मागासवर्ग ४३ वर्षे.
२. परिक्षा शुल्क मागासवर्गातील उमेदवारांना रक्कम रु. ४००/- व अमागास/खुल्या प्रवार्गातील उमेदवारांना रक्कम रु. ८००/- आहे अर्जदाराने परिक्षाशुल्क ऑनलाईन पेमेंट गेटवेव्दारे भरावयाचे आहे. परिक्षा शुल्क डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, नेट बँकीग मार्फत भरणा करता येईल.
३. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक:प्रानिमं १२१४/प्र.क्र. (४३/१४)/१३-अ, दिनांक ०५ जून, २०१४ अन्वये सदर पदासाठी लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेसाठी विषय मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बुध्दीमापन, गणित व तांत्रिक प्रश्न असे असतील.
४. सर्व पदांकरिता मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
५. परिविक्षा कालावधी दोन वर्षांचा राहील. परिविक्षा कालावधी समाधानकारक पुर्ण केल्यानंतरच सेवेत नियमित केले जाईल.
६. निवड झाल्यास नियमाप्रमाणे शारीरिकदृष्टया काम करण्यास सक्षम असल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक, पालघर यांचे प्रमाणपत्र दिलेल्या मुदतीत सादर करावे लागेल.
७. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर नवीन परिभाषिक अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु होईल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही.
८. शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांनी महानगरपालिकेकडे अर्ज सादर करतांना न्यायप्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई संबंधिची माहिती महानगरपालिकेस देणे आवश्यक आहे. सदर माहिती न दिल्यास उमेदवाराच्या सेवा कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार महानगरपालिकेस असतील.
९. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिद्ध झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्टेशनकडुन प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणुक केली जाईल.
१०. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना आहेत.
११. ऑनलाईन अर्ज भरणेसंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास it.vvmc@gov.in या ई-मेल आयडी वर संपर्क करावा.

**विषेश सुचना :-**

१. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.
२. मध्यस्थ/ठक/महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांचा गैर मार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासुन सावध रहावे.

**ठिकाण :- विरार**
**दिनांक :- २८/०९/२०१७**

आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका